जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


19 FEB 2024
पुण्यनगरी

# चांगला लीडर होण्यासाठी चांगल्या गोष्टींचे फॉलोव्हर व्हा : कुलगुरु

## पाचगणीमध्ये नेतृत्त्व कौशल्य विकास शिबीर संपन्न

**पाचगणी : प्रतिनिधी**

चांगला लीडर होण्यासाठी चांगल्या गोष्टींचे फॉलोव्हर व्हा. चांगल्या करिअरसाठी अभ्यासक्रमा बाहेरील गोष्टी शिकाव्या लागतील. त्यासाठी नेतृत्त्व विकास कौशल्य विकास शिबीर महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठ आणि बहाई अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमानाने पाचगणीमध्ये आयोजीत नेतृत्व कौशल्य विकास शिबिरात ते बोलत होते.



पाचगणी : शिबिरात मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, फक्त राजकीय क्षेत्रात नेतृत्त्व नसते तर ते सर्व क्षेत्रात असते. स्वतःला आपल्या ध्येयापर्यंत घेवून जाण्यासाठी स्वतःला लीड करणे हे सुध्दा एका चांगल्या लीडरशीपचे गुण आहेत. तरुणांमध्ये वाचन संस्कृती नष्ट होत आहे. यासाठी तरुणांनी आपल्या आदर्श व्यक्तीमत्त्वाचे साहित्य वाचायला सुरुवात केली पाहिजे. नेतृत्त्व विकास शिबीर हे भविष्याची नेतृत्त्व निर्माण करणारे शिबीर आहे.

यावेळी लेसन आझादी म्हणाले, नेतृत्त्व विकास कौशल्य ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. नेतृत्त्व निर्माण करण्यासाठी सातत्याने ऊर्जा तेवत ठेवावी लागते. या शिबीरामध्ये आपल्याला स्वतः ला ओळखण्याचा दृष्टिकोन निर्माण होईल असे मत व्यक्त केले.

प्रास्ताविक विद्यार्थी कौशल्य विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले. तर सूत्रसंचालन पराग तांदळे यांनी केले. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर, शिबीराच्या समन्वयक सुरेखा आडके उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
19 FEB 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यातील २१ शैक्षणिक संस्थांसाठी ७८४ कोटी

## ११ सार्वजनिक विद्यापीठांचा समावेश

राम शिनगारे
लोकमत न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पायाभूत सुविधांची निर्मिती आणि संशोधनाला चालना देण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयानें देशभरातील २२२ शिक्षण संस्थांना ४ हजार ४७६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यात महाराष्ट्रातील ११ सार्वजनिक विद्यापीठे, सहा मॉडेल कॉलेज, नव्याने स्थापन झालेल्या चार क्लस्टर विद्यापीठ अशा एकूण २१ संस्थांना ७८४ कोटी रुपये मंजूर केले आहेत. हा निधी संबंधित संस्थांना तीन वर्षांमध्ये खर्च करणे अपेक्षित आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयात देशभरातील शैक्षणिक संस्था, विद्यापीठांकडून पीएम-उषा योजनेंतर्गत पायाभूत सुविधा आणि संशोधनासाठी मागीलवर्षी प्रस्ताव मागवले होते. देशभरातून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर केंद्रीय शिक्षण मंत्रालयातील उच्च शिक्षण विभागातील प्रोजेक्ट अॅप्रूव्हल बोर्डाने (पीएबी) मागील महिन्यात बैठक घेतली. त्यामध्ये विद्यापीठांसह शैक्षणिक संस्थांच्या प्रस्तावांची छाननी केल्यानंतर २२२ संस्थांना ४ हजार ४७६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. येत्या आठ दिवसात पहिल्या टप्प्यातील अनुदान संबंधित संस्थांना प्राप्त होणार आहे.

### पंतप्रधानांच्या हस्ते उद्या उद्घाटन

पीएम-उषा योजनेत २२२ शिक्षण संस्था, विद्यापीठांना ४ हजार ४७६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या योजनेचे उद्घाटन मंगळवारी सकाळी ११ वाजता दिल्लीत होत आहे. त्यात निधी मंजूर झालेल्या संस्था दूरदृश्य प्रणालीद्वारे कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

### यांना मिळणार निधी

#### प्रत्येकी १०० कोटी

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
- गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
- एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

#### प्रत्येकी ४ कोटी

जालना, गडचिरोली, बुलढाणा, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथील मॉडेल कॉलेजला प्रत्येकी ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

#### प्रत्येकी २० कोटी मंजूर

- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- डॉ. होमी भाभा स्टेट विद्यापीठ, मुंबई
- मुंबई विद्यापीठ
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

### क्लस्टर विद्यापीठांना प्राधान्य

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात क्लस्टर विद्यापीठांना प्राधान्य देण्यात आले आहे. या धोरणानुसार राज्यात नव्याने मंजूर झालेल्या होमी भाभा क्लस्टर विद्यापीठ, मुंबई, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, हैदराबाद (सिंड) नॅशनल कॉलेज क्लस्टर विद्यापीठ, मुंबई आणि स्वतंत्र विद्यापीठ बनलेल्या फर्ग्युसन महाविद्यालयाला प्रत्येकी ५५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 FEB 2024
पुढारी

# स्त्रियांच्या विनोदी लेखनात आयुष्याकडे खेळकरपणे बघण्याची दृष्टी : डॉ. पौडवाल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्त्रियांच्या विनोदी लेखनात आयुष्याकडे खेळकरपणे बघण्याची दृष्टी आहे, असे मत डॉ. सुषमा पौडवाल यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ, मराठी विभागातर्फे आयोजित कवी कुसुमाग्रज व्याख्यानमालेंतर्गत 'मराठीतील स्त्रियांचे विनोदी लेखन' या विषयावरील विशेष व्याख्यानप्रसंगी त्या बोलत होत्या. डॉ. पौडवाल म्हणाल्या, मराठी वाङ्‌मयात लेखिकांनी केलेले विनोदी लेखन संयत व संयमित स्वरूपाचे आहे.

डॉ. पौडवाल यांनी मराठी वाङ्‌मयाच्या मौखिक परंपरेपासून आधुनिक काळापर्यंत स्त्रियांच्या वाङ्‌मयातून व्यक्त झालेला विनोद, त्याचे स्वरूप, शैली आणि स्त्रियांच्या विनोदी लेखनाकडे बघण्याचे विविध दृष्टिकोन याबाबत महत्त्वपूर्ण विवेचन केले.

डॉ. रणधीर शिंदे यांनी अध्यक्षीय मनोगतात मराठीतील विनोदी लेखनाची परंपरा व अभ्यास याबाबत भाष्य केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. वक्त्यांचा परिचय सुस्मिता खुटाळे यांनी करून दिला. यावेळी डॉ. अरुण शिंदे, सीमा देशमुख आदी उपस्थित होते. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

19 FEB 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातून करता येणार ऑनलाईन एमबीए

## राज्यातील एकमेव दूरशिक्षण, ऑनलाईन केंद्र; विद्यार्थ्यांना होणार फायदा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विद्यापीठ अनुदान आयोगाचे विविध ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करण्यास पात्र झाले आहेत. आयोगाच्या मान्यतेनुसार आता विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत येत्या शैक्षणिक वर्षापासून ऑनलाईन एमबीए चा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठ नॅक 'ए++' मानांकनप्राप्त झाल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेने एमबीए, एम.कॉम., एम.एस्सी (गणित), एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) हे अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यास पात्र ठरले



शिवाजी विद्यापीठातून

आहे. हे अभ्यासक्रम सुरू करण्याची कार्यवाही विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे सुरू आहे. यातील ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रम सुरू करण्यास 'यूजीसी'ची मान्यता नुकतीच प्राप्त झाली आहे.

अभ्यासक्रम प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकालापर्यंतची सर्वच शैक्षणिक प्रक्रिया ऑनलाईन स्वरुपाची असणार आहे. ही पदवी अन्य मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष आहे.

अभ्यासक्रमासाठी सुसज्ज लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीमद्वारे (एल.एम.एस.) विषयतज्ज्ञांनी विकसित केलेले व्हिडीओ लेक्चर्स, ई-बुक्स, लाईव्ह कौन्सिलिंग सेशन, डिस्कशन फोरम, प्रॅक्टीस टेस्ट आदी अध्ययन-अध्यापन सामग्री प्रवेशित विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून त्यांना रोजगार संधींचा लाभ घेता येणार आहे.

### लाखो विद्यार्थ्यांनी घेतला लाभ

यूजीसी, दूरशिक्षण परिषद व ए.आय.सी.टी.ई. या संस्थांकडून मान्यताप्राप्त बी.ए., बी.कॉम., एम.ए.(मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र व इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी.(गणित) व एमबीए असे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम, ग्रामीण पत्रकारिता, ग्रंथालय व्यवस्थापन, टुरिझम आणि ट्रॅव्हल्स, बिझनेस मॅनेजमेंट आदी प्रमाणपत्र अभ्यासक्रम दूरशिक्षण केंद्रात पारंपरिक बहिःस्थ पद्धतीने सुरू आहेत. त्यांचा आजवर लाखो विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे.

"

विद्यापीठ अनुदान आयोगाने दूरशिक्षणाच्या विविध अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे. ऑनलाईन एमबीएच्या अभ्यासक्रम सुरू करणारे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव राज्य विद्यापीठ ठरले आहे. ही अभिमानाची बाब आहे. त्यामुळे विद्यार्थी-विद्यार्थिनींसह नोकरदार, गृहिणी आदी कोठेही कामाच्या व्यापात सांभाळत ऑनलाईन एमबीए पदवी घेता येणार आहे.

- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

19 FEB 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

NAAC A++
Accredited
State University
having National Level
Category-I Status

# SHIVAJI UNIVERSITY
# KOLHAPUR

Centre for Distance and Online Education

Offering
**AICTE and UGC Approved**

# Online M.B.A. Programme

**Global Career Opportunities at your fingertips.....!!**



## Registration

**Registration and Admissions will open from 26th February, 2024**

## Pre-Registration

**Click following Link of Pre-Registration Form https://rb.gy/znonxg OR Fill the form by Scanning the QR Code**

## Contact

Email: onlinemba@unishivaji.ac.in
Phone: 0231-2609451
7709065295 / 9890795658